कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड जन्मशताब्दी साजरी करण्याबाबत
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ८/१०/२०
रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे संपन्न झालेली बैठक.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०००/प्र.क्र.३०८/मावक-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ९ ऑक्टोबर, २००१

पहा :- १) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
क्र.संकीर्ण-२०००/प्र.क्र.३०८/मावक-१. दिनांक २४/११/२०००.
२) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
क्र. संकीर्ण-२०००/प्र.क्र.३०८/मावक-१, दिनांक १७/७/२००१.
३) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
क्र. संकीर्ण-२०००/ प्र.क्र.३०८/मावक-१. दिनांक ५/१०/२००१.

शासन निर्णय :- वरीलप्रमाणे विषयास अनुसरुन शासन निर्णय, दिनांक १७ जुलै २००१ अनुसार महाराष्ट्र शासनाने कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांची जन्मशताब्दी दिनांक १५/१०/२००१ ते १५/१०/२००२ या वर्षात साजरी करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १७/७/२००१ अनुसार मंत्री, सामाजिक न्याय यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यकारी समिती आणि शासन निर्णय दिनांक २४/११/२००१ व ५/१०/२००१ नुसार मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली सर्व समावेशक राज्यस्तरीय धोरणात्मक निर्णय घेणारी समिती शासनाने गठीत केली असून, त्याचे कामकाज सुरु झाले आहे. त्यानुसार सदर जन्मशताब्दीचे कार्यक्रम निश्चित करण्यासाठी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे दिनांक ८/१०/२००१ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व इतर मंत्रीगण तसेच राज्यस्तरीय जन्मशताब्दी समितीचे सन्माननीय सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते. सदर बैठकीत मा. मुख्यमंत्री महोदयांनी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांच्या जन्मदिनी अर्थात दिनांक १५/१०/२००१ रोजी. दादासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन जन्मशताब्दीची सुरुवात करावी व त्यानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रम राबविण्यात यावेत असे निदेश दिले आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तातडीच्या सूचना देण्यात येत आहेत :-

कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड हे आमदार व खासदारही होते त्यांनी रुढीपरंपरेविरुध्द व अस्पृश्यतेविरुध्द सामाजिक चळवळ उभारली ; भूमिहीन शेतमजूर व कामगारांसाठी देशात अनेक ठिकाणी सत्याग्रह केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांचा सिंहाचा वाटा होता अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब

../-

... यांच्या पश्चातही कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांनी पुरोगामी महाराष्ट्र घडविण्यामध्ये ... ची कामगिरी केली. त्यांच्या या वैशिष्ट्यपूर्ण कामगिरीमुळे सामाजिक व राजकीय चळवळीचे ... कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांची नोंद झाली. माजी खासदार भाऊराव कृष्णराव ... दादासाहेब गायकवाड यांचा जन्म दिनांक १५ ऑक्टोबर १९०२ रोजी आंबे (आम्बेरी) ता.दिंडोरी, ... नाशिक येथे झाला असून, दिनांक २९/१२/१९७१ रोजी विलिंग्टन रुग्णालय, नवी दिल्ली येथे त्याचे ... निधन झाले व दिनांक ३१/१२/१९७१ रोजी नाशिक येथे गोदावरी गंगा पाठावर त्यांचा अंत्यविधी ... .

कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांचे वरील मौलिक कार्य विचारात घेऊन ... स्तरीय जन्मशताब्दी समितीने वर्षात विविध कार्यक्रम हाती घेण्याचे ठरविले असून, ... नाशिक येथे दिनांक १५/१०/२००१ रोजी जन्मशताब्दीचा उद्घाटन सोहळा मा. मुख्यमंत्री ... च्या शुभहस्ते व मा. उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली त्याचदिवशी सायंकाळी मुंबई येथे ... कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांचे स्मरणार्थ लोकराज्याचा विशेषांक प्रकाशित ... करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. आणि सदर जन्मशताब्दीचा समारोप दिनांक ... /१०/२००२ रोजी मुंबई येथे होणार आहे. या शताब्दी वर्षात राबवावयाच्या कार्यक्रमामध्ये ... कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांच्या जीवन कार्यावर गौरव ग्रंथ प्रकाशित करणे, इयत्ता ... वी ते १० वी यापैकी एका वर्गात कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांचा धडा समाविष्ट ... करणे, पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांचे चित्र असलेले ३ रुपयाचे पोस्टाचे तिकीट प्रसिध्द ... करणे, महाराष्ट्र विधानसभा/विधान परिषदेच्या सभागृहात कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड ... यांचे तैलचित्र लावणे, कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांच्या नावाने दरवर्षी ... ,०००/- पुरस्कार एक व्यक्ती व एक संस्था यांना प्रदान करणे, दादासाहेबांच्या कार्यास ... अनुसरुन अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांपैकी भूमिहीन शेतमजुरांसाठी जमीन खरेदी करुन ... , योजना सर्व जिल्हयामध्ये राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन असून, त्यासाठी ... विशेष घटक योजनेतून तरतूद उपलब्ध करुन देण्याचा मानस आहे. कर्मवीर पद्मश्री ... दादासाहेब गायकवाड यांच्या स्मरणार्थ काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह क्रांतीस्तंभ, धर्मांतर ... स्मृतिस्तंभ, भूमिहीनांचा सत्याग्रह मुखेड, जिल्हा-नाशिक येथे शिलालेख व मुंबई ... कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांचे विचार पसरविणारे दीपज्योत स्तंभ इत्यादी ... स्मारके उभारण्याचा मानस आहे. वरील सर्व कार्यक्रमांच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्व जिल्हयात ... जन्मशताब्दी वर्षात विविध कार्यक्रम राबविण्याचे शासनाने ठरविलेले आहे.

..३/-

वरील पार्श्वभूमी लक्षात घेऊन सर्व जिल्हाधिका-यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी या संदर्भात कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड जन्मशताब्दी जिल्हास्तरीय कार्यकारी समिती स्थापन करावी. सदर समिती त्या त्या जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात यावी व पालकमंत्र्यांच्या सल्ल्याने त्यात खालील सदस्य व लोकप्रतिनिधींचा समावेश असावा. या जिल्हास्तरीय समितीत जिल्हाधिकारी हे कार्यकारी अध्यक्ष व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे सदस्य सचिव असतील आणि सदस्य म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधी यामध्ये मान्यवर खासदार, आमदार, महापौर, जिल्हापरिषद अध्यक्ष व दादासाहेबांचे कार्य यापुढेही चालू ठेवणारे काही सामाजिक कार्यकर्ते यांना या जिल्हास्तरीय समितीत समावेश असावा.

वर प्रस्तावित जिल्हास्तरीय समितीच्या देखरेखीखाली दिनांक १५/१०/२००१ रोजी कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांच्या जन्मदिनी आयोजित करावयाच्या विविध कार्यक्रमाबाबत रुपरेषा ठरवून, दादासाहेबांचे सामाजिक कार्य लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रभात फे-या, परिसंवाद, सामाजिक मेळावे इत्यादी विविध कार्यक्रम आयोजित करावेत व दिनांक १५/१०/२००१ रोजी कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन जन्मशताब्दीचा प्रारंभ करावा.

या जन्मशताब्दी कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्ह्याला या वर्षी (सन २००१-२००२) रु. १०,०००/- प्रमाणे रु. ३.५० लाख मंजूर केले असून, तो उपलब्ध होण्यामध्ये काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे सूचित करण्यात येते की, सदरचा खर्च तातडीने भागविण्यासाठी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्या कार्यालयाकडे असणा-या आकस्मिकता निधीमधून किंवा जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाच्या आकस्मिकता निधीतून सध्याचा खर्च भागविण्यात यावा. त्यानंतर शासनाकडून त्याची प्रतिपूर्ती करण्यात यावी. त्या व्यतिरिक्त जन्मशताब्दी वर्षात विविध कार्यक्रमासाठी लागणारा ज्यादाचा खर्च वर प्रस्तावित केलेल्या प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हास्तरीय कार्यकारी जन्मशताब्दी समितीने लोकवर्गणीच्या रुपात निधी जमा करुन, त्याद्वारे खर्च भागविण्यात यावा. जेणेकरुन, सदर जन्मशताब्दी साजरी करण्यास लोकांचाही मोठा सहभाग राहील.

या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव (सा.न्या.) व संचालक, समाजकल्याण, पुणे यांना वेळोवेळी सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ना.ना. भडीकर)
उप सचिव, सामाजिक न्याय.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी.

..४/-

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी

सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी

मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई

G.R.

**कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव**
**<u>गायकवाड पुरस्कार - सन २००१-२००२</u>**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- सामापु- २००२/प्र.क्र.८०/मावक-१**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक : १० एप्रिल, २००३**

<u>प्रस्तावना</u> : महाराष्ट्र शासनाने कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड यांनी समाजातील भूमिहीन, दलित घटकांसाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन दि. १५ ऑक्टोबर, २००१ ते १५ ऑक्टोबर, २००२ कालावधीत जन्मशताब्दी वर्ष साजरे केले. या कार्यक्रमाचाच एक भाग म्हणून भूमिहीन, दलित क्षेत्रात उल्लेखनिय व निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या एका व्यक्तीस व एका सामाजिक संस्थेस दरवर्षी राजस्तरीय पुरस्कार देण्याचे ठरविले.अशा सामाजिक संस्था व व्यक्ती यांना या पुरस्काराच्या माध्यमातून त्यांनी चालविलेले कार्य अधिक जोमाने व निस्वार्थपणे करण्यास स्फूर्ती मिळेल. पुरस्कारासाठी दि. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर अशी गणना समजण्याचे ठरविले. पुरस्काराचे स्वरुप सन्मानपत्र, व्यक्तीस एक शाल व श्रीफळ तसेच रोख रक्कम रु.२१,००१/- अशाच प्रकारे संस्थेस एक सन्मानपत्र, एक शाल व श्रीफळ तसेच रोख रक्कम रु.३०,००१/- असे ठरविण्यात आले.

<u>शासन निर्णय</u> :- पद्मश्री कर्मवीर दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार या योजनेंतर्गत सन २००१-२००२ या वर्षाकरिता (१ जानेवारी २००१ ते ३१ डिसेंबर, २००१) खाली नमूद केलेल्या व्यक्ती व संस्थेची निवड करण्यात येत आहे.

१) व्यक्ती : श्री. मधुकर यशवंत लुपलोंढे, पिंपळगांव केतकी, ता.दिंडोरी, जि. नाशिक, हल्ली मुक्काम स्वप्नआकार को.ऑ.हौ.सोसायटी, जी वींग, ४०१, यारी रस्ता, वर्सोवा अंधेरी पश्चिम, मुंबई-४०० ०६१, दुरध्वनी क्र.२६३५ २६४७.

२) संस्था : डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञान विकास केंद्र, रमा कुटीर, गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक-२, दुरध्वनी क्र.२५७४ ४४१.

२. पद्मश्री कर्मवीर दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार प्राप्त व्यक्ती आणि संस्थांचे प्रतिनिधी यांना पुरस्कार वितरण समारंभाच्या कालावधीत तीन दिवसांकरीता शासकीय पाहुणे म्हणून समजण्यात येतील.

३. "पद्मश्री कर्मवीर दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार" पुरस्काराकरिता निवड केलेल्या व्यक्ती आणि संस्थेचे नांव महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये (सर्वसाधारण भाग ) प्रसिध्द करण्यात यावी.

०.प.

४. संचालक, समाजकल्याण यांना सन २००३-०४ या वर्षाकरिता खाली मंजूर केलेल्या लेखाशिर्षामधून याबाबतचा खर्च करण्यास संचालक, समाजकल्याण, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

२२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण-०२-मागासवर्गीयांचे कल्याण-८०० इतर खर्च-८०, सर्वसाधारण-१०३, स्वयंसेवी संस्थांना मदत (०२) (०३) स्वयंसेवी संस्थांना अनुदाने.

कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड जन्मशताब्दी आणि बक्षीस वितरण (२२२५ ३१२ ६) ४१-सहाय्यक अनुदान.

या समारंभाचे आयोजन दिनांक १४ एप्रिल, २००३ रोजी मुंबई येथे करावयाचे प्रस्तावित आहे. याबाबत संचालक, समाजकल्याण, पुणे यांचे मार्फत फॅक्स / पत्राने / दूरध्वनीवरुन स्वतंत्रपणे कळविण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( ग. कि. बाग )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय आयुक्त, नाशिक / पुणे
जिल्हाधिकारी, नाशिक / पुणे
विभागीय समाजकल्याण अधिकारी, नाशिक
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नाशिक
महालेखापाल, महाराष्ट्र-१ व २, मुंबई-नागपूर (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता).
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, महासंचालनालय, मुंबई. त्यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात आलेल्या पद्मश्री कर्मवीर दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार प्राप्त व्यक्ती व संस्थेची माहिती प्रसिध्दीस द्यावी.
निवड नस्ती - कार्यासन-१

कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव
गायकवाड पुरस्कार - सन २००२-२००३

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,

शासन निर्णय क्रमांक :- दागापु- २००४/प्र.क्र५९/मावक-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : ७ ऑगस्ट ,२००४

प्रस्तावना : कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड यांनी समाजातील भूमिहीन, दलित घटकासाठी केलेल्या कार्याची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन दि. १५ ऑक्टोबर, २००१ ते १५ ऑक्टोबर, २००२ या कालावधीत त्यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे केले. या कार्यक्रमाचाच एक भाग म्हणून भूमिहीन, दलित क्षेत्रात उल्लेखनिय व निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या एका व्यक्तीस व एका सामाजिक संस्थेस दरवर्षी राजस्तरीय पुरस्कार देण्याचे ठरविले. या पुरस्काराच्या माध्यमातून अशा सामाजिक संस्था व व्यक्ती यांना त्यांनी चालविलेले कार्य अधिक जोमाने व निस्वार्थपणे करण्यास स्फूर्ती मिळेल. पुरस्काराचे स्वरुप व्यक्तीस एक सन्मानपत्र, एक शाल व श्रीफळ तसेच रोख रक्कम रु.२१,००१/- अशाच प्रकारे संस्थेस एक सन्मानपत्र, एक शाल व श्रीफळ तसेच रोख रक्कम रु.३०,००१/- असे ठरविण्यात आले.

शासन निर्णय :- पद्मश्री कर्मवीर दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार या योजनेंतर्गत सन २००२-२००३ या वर्षाकरिता खाली नमूद केलेल्या व्यक्ती व संस्थेची निवड करण्यात येत आहे.

१) व्यक्ती : श्री. देवराव विठ्ठल फडतरे, ३६७, गौतम नगर, गरीबी हटाव झोपडपट्टी, विजापूर नाका, विजापूर रोड, सोलापूर-४.

२) संस्था : पिपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई.

२. पद्मश्री कर्मवीर दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार प्राप्त व्यक्ती आणि संस्थाचे प्रतिनिधी याना पुरस्कार वितरण समारभाच्या कालावधीत तीन दिवसाकरीता शासकीय पाहुणे म्हणून समजण्यात येईल.

३. "पद्मश्री कर्मवीर दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार"करिता निवड केलेल्या व्यक्ती आणि संस्थेचे नाव महाराष्ट्र शासन राजपत्र (सर्वसाधारण भाग) मध्ये प्रसिध्द करण्यात यावे.

४. संचालक, समाजकल्याण यांना सन २००४-०५ या वर्षाकरिता २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग याचे कल्याण-०३-मागासवर्गीयांचे कल्याण-८०० इतर खर्च-८०, सर्वसाधारण-१०२, स्वयसेवी संस्थाना मदत (०२) (०३) स्वयेसवी संस्थाना अनुदाने कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड जन्मशताब्दी आणि बक्षीस वितरण (२२२५ ३१२ ६) ४१-सहाय्यक अनुदान यासाठी मंजूर केलेल्या लेखाशिर्षा मधून याबाबतचा खर्च करण्यास संचालक, समाजकल्याण, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. या समारभाचे आयोजन दिनांक १० ऑगस्ट,२००४ रोजी महाड येथे करावयाचे प्रस्तावित आहे. याबाबत सचालक, समाजकल्याण,पुणे याचे मार्फत फॅक्स / पत्राने / दूरध्वनीवरुन स्वतंत्रपणे कळविण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( अ.रा.घोत्रे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,
सचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय आयुक्त,कोकण भव १ / पुणे
जिल्हाधिकारी, सोलापूर/मुंबई
विभागीय समाजकल्याण अधिकारी,मुंबई/पुणे
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,सोलापूर/मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-१ व २, मुंबई-नागपूर (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, महासंचालनालय, मुंबई.
त्यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात आलेल्या पद्मश्री कर्मवीर दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार प्राप्त व्यक्ती व संस्थेची माहिती प्रसिध्दीस द्यावी.

निवड नस्ती - मावक-१.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार, कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार या पुरस्कारांच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रसिद्धी- २०२५/प्र.क्र.०८ /समन्वय

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक:- ०४ मार्च, २०२५

वाचा:- १. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. दमिपु-२००१/ प्र.क्र.१८६/मावक-४ दि.२५.०७.२००१

२. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. संरपु-२००४/ प्र.क्र.१८४/ मावक-४ दि.१६.०७.२००४

३. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. दागापु-२००४/ प्र.क्र.५९/ मावक-१ दि.०७ .०८.२००४

४. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. असापु-२००१/ प्र.क्र.१०५/ मावक-७ दि.२२.०६. २०१०

**प्रस्तावना:-**

सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणुन दरवर्षी १) डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, २) संत रविदास पुरस्कार ३) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार ४) कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार असे पुरस्कार देण्यात येतात. सदर पुरस्कारांच्या रक्कमेत बऱ्याच कालावधीपासून वाढ करण्यात आलेली नसल्याने विविध लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक संस्था यांचेकडून पुरस्काराच्या रक्कमेत वाढ करण्याची मागणी करण्यात येत होती त्यानुषंगाने सदर पुरस्कारांच्या रक्कमेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

१. सामाजिक न्याय विभागामार्फत विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना पुरस्कार प्रदान करण्यात येतात. सदर पुरस्कार रक्कमेत सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार वाढ करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी पुरस्कारांबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या धोरणाचा अवलंब करणे आवश्यक राहिल.

३. सदर शासन निर्णय सन २०२४-२५ या वित्तीय वर्षापासून घोषित करण्यात येणाऱ्या पुरस्कारांना लागु राहिल.

४. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च संबंधित लेखाशिर्षाखाली त्या त्या वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागवण्यात यावा.

५. प्रस्तुत प्रकरणी आयुक्त समाज कल्याण, पुणे यांना नियंत्रक अधिकारी व प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ /विनियम/ भाग-२ ,दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-३, अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकिय विभागास असलेल्या अधिकारात अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक-:- अर्थसं-२०२२/प्र.क्र.४३/अर्थ-३, दिनांक ०४.०४.२०२२,शासन परिपत्रक अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दिनांक १२, फेब्रुवारी २०२५, शासन परिपत्रक अर्थसं-२०२४/प्र.क्र.३४/अर्थ-३, दिनांक १, एप्रिल २०२४, शासन परिपत्रक अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३ दिनांक २५, जुलै २०२४, मधील सर्व परिच्छेद व परिष्ठातील अटी नुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी आयुक्त, समाज कल्याण ,पुणे यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२५०३०४१४१०२१५८२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUNITA VIRENDRA GAIKWAD

Digitally signed by SUNITA VIRENDRA GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT, 2.5.4.20=d31fff582bcd0471a184e5d4bae4b75ca334805 3d0eb588b97308bad1ac67a40, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7B3D0DDAE7B5F68C71F56026F5D7EB976A590FFF12E613DAC6FD709B6C801646, cn=SUNITA VIRENDRA GAIKWAD
Date: 2025.03.04 14:12:46 +05'30'

(सुनिता गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी,मंत्रालय,मुंबई
३. मा. मंत्री,सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/परिषद, विधानमंडळ, मुंबई
५. मा. राज्यमंत्री,सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
६. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई
७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग,मंत्रालय,मुंबई
८. आयुक्त,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे
९. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) महाराष्ट्र राज्य,मुंबई/ नागपूर
१०. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११. सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय.
१२. सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय.
१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१४. सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण विभाग.
१५. सर्व सहायक आयुक्त,समाजकल्याण विभाग
१६. सर्व संबंधित व्यक्ती / संस्था.
१७. निवडनस्ती (समन्वय).

# प्रपत्र

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | लेखाशिर्ष | पुरस्काराची संख्या | | सद्या अस्तित्वात असलेली पुरस्कार रक्कम (रूपये | | सुधारित पुरस्कार रक्कम (रूपये) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | व्यक्ती | संस्था | प्रतिव्यक्ती | प्रतिसंस्था | प्रतिव्यक्ती | प्रतिसंस्था |
| १ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार | २२२५-०९९६ | ५१ | १० | १५,००० | २५,००१ | ७५,००० | १,००,००० |
| २ | संत रविदास पुरस्कार | २२२५-०९९६ | ०१ | ०१ | २१,००० | ३०,००१ | ५१,००० | १,००,००० |
| ३ | लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार | २२२५-०९९६ | २५ | ०६ | २५,००० | ५०,००० | ५१,००० | १,००,००० |
| ४ | कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार | २२२५-३१२६ | ०१ | ०१ | ५१,००० | ५१,००० | ५१,००० | १,००,००० |

*******************************************************************************